दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३१८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२९ जून २०२५

प्रेरणादायी
**सुंदर सुविचार**
आयुष्यातील काही गोष्टी कब्बडी
च्या खेळाप्रमाणे असतात तुम्ही
यशाच्या रेषेला हात लावताच काही
लोक तुमचे पाय पकडायला सुरवात करतात

# बुलडाणा जिल्ह्याला पावसाने धो-धो धुतलं !

## शेतकऱ्यांच्या शेतीचे अतोनात नुकसान... भूमिपुत्र खासदार न्याय मिळवून देणार ?

### राज्य शासनासह केंद्र शासनाकडूनही नुकसानीची भरपाई मिळवून देणार - प्रतापराव जाधव



**अक्षराज : उध्दव आटोळे**
**दि.२८, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील वडगाव तेजन गावात दि.२५ आणि २६ जून रोजी ढगफुटी सदृश मुसळधार पाऊस झाला. गावाजवळून वाहणाऱ्या नदीला अचानक पूर आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांची फळबागेसह सुपीक जमीन आणि पिकं वाहून गेली आहेत.

शेतकऱ्यांनी पिकं तर गेलंच, पण आता जमीनच नाही उरली अशी भावना व्यक्त केलीय.गावकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. कृषी सहाय्यक, तलाठी, सरपंच आणि ग्रामसेवक यांनि प्राथमिक पाहणी करून शासनाकडे अहवाल पाठविण्याचे सांगितले आहे.

या शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आज २८ जून रोजी वडगाव तेजन गावातील शेतकऱ्यांच्या बांधावर केंद्रीय आयुष मंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टीमसह पाहणी करून सर्व अधिकारी व गाव पातळीवरील कर्मचाऱ्यांना शेतकऱ्यांचे पूर्ण पंचनामे करून ताबडतोब वरिष्ठ कार्यालयात पाठवून देण्याचे व कोणतेही नुकसानग्रस्त शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घेण्याचे आदेश दिले. व शेतकऱ्यांना राज्य शासनासह केंद्र शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी त्यांचे सोबत माजी आमदार डॉक्टर संजय रायमुलकर, शिवसेना जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदू भाऊ मापारी, शिव पाटील तेजनकर सरपंच डॉक्टर विजय तेजनकर व अन्य बरेच पदाधिकारी अधिकारी व गावकरी हजर होते.

तर दुसऱ्या दौऱ्यामध्ये शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सुद्धा वडगाव तेजन मधील सत्यनारायण तेजनकर यांच्या आंबा बागेची पाहणी करून झालेल्या नुकसानी बद्दल हळहळ व्यक्त केली. सर्व शेतकऱ्यांना शासनाकडून तात्काळ मदत न मिळाल्यास आंदोलन मार्गाने शेतकऱ्यांना न्याय देणार असल्याचे सांगितले. यावेळी त्यांच्यासोबत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सहदेव लाड सह राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष सदानंद पाटील तेजनकर, सरपंच डॉ. विजय तेजनकर, ग्रामसेवक नंदकिशोर तेजनकर, तलाठी राजेश भाकडे, कृषी सहाय्यक राजू शिरसाट, सह अन्य बरेच कर्मचारी, पदाधिकारी व गावकरी हजर होते.

शेतकऱ्यांच्या अतोनात झालेल्या नुकसानी बद्दल प्रशासनाला पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच शेतकरी पूर्वरत जागेवर येण्यासाठी केंद्र शासनासह राज्य शासनाकडून जास्तीत जास्त अनुदान मिळवून देणार आहे.
**- प्रतापराव जाधव, केंद्रीय आयुष मंत्री भारत सरकार**

शेतकऱ्यांचे अतोनात झालेल्या नुकसानीचे शासनाने १०० टक्के नुकसान भरपाई ताबडतोब शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी. अन्यथा आंदोलनाच्या मार्गाने शेतकऱ्यांना नेहमीप्रमाणेच न्याय देण्याचे काम मी करणार.
**- रविकांत तुपकर, शेतकरी नेते**

वडगाव तेजन मध्ये एका दिवसात १८३.५ मिलिमीटर व सतत २ दिवस २०० मिलिमीटर पेक्षा जास्त पावसाची नोंद होऊन अतिवृष्टीपेक्षा ३ पट जास्त पाऊस पडला असून याने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे पंचनामे सुरू आहेत. पंचनामे पूर्ण होताच संपूर्ण अहवाल वरिष्ठ कार्यालयात सादर करणार असून कोणीही नुकसानग्रस्त शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही याची आम्ही सर्वजण दक्षता घेऊ.
**- राजू शिरसाट, कृषी सहाय्यक, वडगाव तेजन**

माझ्या एक हेक्टर शेतामधील १२०० झाड आंबा लागवड, स्वखर्चाने केलेला ४०० मीटर रस्ता, वन्य प्राण्यांपासून रक्षण होण्याच्या उद्देशाने केलेले संपूर्ण शेताला तारकुंपण, आंब्याच्या झाडाला केलेले ड्रीप, शेतातील दोन स्पिंकलर्स संच, विहीर सोलर पॅनल व इतरही संपूर्ण उद्धवस्त झाले आहे. असेच नुकसान गावातील संपूर्ण शेतकऱ्यांचे झालेले आहे. त्यामुळे शासनाने आमच्या गावातील सर्व शेतकऱ्यांना तात्काळ जास्तीत जास्त मदत करावी अन्यथा शेतकऱ्यांना शेती विकण्याशिवाय पर्याय उरणार नाही.
**- सत्यनारायण तेजनकर, शेतकरी, वडगाव तेजन**

# भाजपचं ठरलं! प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंच्या जागी रवींद्र चव्हाणांची नियुक्ती



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२८, मुंबई :** भाजपच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची माळ माजी मंत्री आणि पक्षाचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या गळ्यात पडणार असल्याचे निश्चित झाले आहे. याबाबतची अधिकृत घोषणा मंगळवार, १ जुलै रोजी करण्यात येणार असल्याचे पक्षाने शुक्रवारी उशिरा जाहीर केले. याच दिवशी पक्षाकडून राष्ट्रीय परिषद सदस्यांच्या नावांचीही घोषणा केली जाणार आहे, तर आज, रविवारी पक्षाच्या राज्य परिषद सदस्यांची नावे जाहीर करण्यात येणार असल्याचे पक्षाने म्हटले आहे.

राज्यात गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रिपदावर वर्णी लागल्यानंतर त्यांच्या जागी नव्या प्रदेशाध्यक्षांची निवड केली जाणार होती. या पदासाठी रवींद्र चव्हाण यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात होते. मात्र पक्षाकडून त्यांच्याकडे प्रथम कार्याध्यक्षपदाची धुरा देण्यात आली.

याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काही दिवसांपूर्वी या निवडीचे संकेत दिले होते. अखेर पक्षाने प्रदेशाध्यक्षपदासह राष्ट्रीय परिषद सदस्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमांची घोषणा केली. यात चव्हाण यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांची निरीक्षक म्हणूनच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या उपस्थितीत चव्हाण यांच्या नावाची घोषणा केली जाणार असल्याचे सांगितले जाते.

भाजप प्रदेश कार्यालयात ३० जूनला प्रदेशाध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. दुपारी ३ ते ५ या वेळात हे अर्ज दाखल करता येतील. १ जुलैला सायंकाळी ५ वाजता प्रदेशाध्यक्ष व राष्ट्रीय परिषद सदस्यांच्या निवडीची घोषणा करण्यात येईल, अशी माहिती प्रदेश निवडणूक अधिकारी आ. चैनसुख संचेती यांनी दिली.

# १५ वर्षाच्या विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं, नंतर कारमध्ये घृणास्पद कृत्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२८ नागपूर :** प्रेमाच्या जाळ्यात अडकवून युवकाने कारमध्ये १५ वर्षीय विद्यार्थिनीवर बलात्कार केला. याप्रकरणी सदर पोलिसांनी बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून युवकाला अटक केली आहे.

सुमित ऊर्फ साहिल मनोहर चंदेल असे अटकेतील युवकाचे नाव आहे. तो वाहनचालक आहे. तर पीडित मुलगी दहावीत शिकते. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, एप्रिल महिन्यात एका लग्नात मुलीची सुमितसोबत ओळख झाली. दोघांनी एकमेकांचे मोबाईल नंबर घेतले. काही दिवसांपूर्वी सुमितने इस्टाग्रामवर तिला मेसेज केला. तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकविले.

पीडित अल्पवयीन मुलगी २१ जूनला मोबाईलवर सुमितसोबत बोलत होती. सतत मोबाईलवर बोलत असल्याने नातेवाईक तिला रागावले. दुपारी ३ वाजताच्या सुमारास सुमितने तिच्याशी संपर्क साधला. तिला गड्डीगोदाम चौकात भेटायला बोलाविले. मुलगी तेथे आली. सुमित तिला कारने बेलतरोडीतील निर्जनस्थळी घेऊन गेला. तिथे तिच्यावर बलात्कार केला. मुलीने कशीबशी सुटका केली. ती मनीषनगर परिसरात आली. पीडितेने एका युवकाकडील मोबाइलवरुन नातेवाइकांशी संपर्क साधला. नातेवाइक तेथे गेले. तिला घेऊन घरी आले. त्यानंतर मुलीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी बलत्कार आणि अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षक संदिया सोमनकर यांनी शोध घेऊन सुमितला अटक केली.

## थोडक्यात

### मराठी अस्मितेसाठी ऐक्याचा निर्धार




**अक्षराज : विनोद वास्कर**
**दि.२८, दिवा (ठाणे) :** भाजप सरकारच्या 'हिंदी शक्ती'च्या वाढत्या दबावाला उत्तर देण्यासाठी आणि मराठी माणसाच्या अस्मितेचा आवाज बुलंद करण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे व राज ठाकरे या ठाकरे बंधूंनी एकत्र येत येत्या ५ जुलै २०२५ रोजी गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान, मुंबई येथे एक विराट मोर्चा आयोजित केला आहे.

या ऐतिहासिक मोर्चाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे या मोर्चात कोणत्याही पक्षाचा झेंडा असणार नाही. हा मोर्चा केवळ आणि केवळ आपल्या मायबोली मराठीसाठी, आपल्या मातीतल्या माणसासाठी, आणि आपल्या महाराष्ट्रासाठी असणार आहे.

या पार्श्वभूमीवर कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी दिवा शहरात बॅनर झळकावून मराठी जनतेला एकत्र येण्याचे आवाहन केले.

ही वेळ आहे एकत्र येण्याची... मायमराठीच्या रक्षणासाठी आणि ठाकरे बंधूंना एकत्र उभं करण्यासाठी पाच तारखेला मुंबईत ठाण मांडूया! असे भावनिक आवाहन त्यांनी यावेळी केले.

मोर्चा ही फक्त चळवळ नाही, ती आपली ओळख, आपली भाषा, आपली संस्कृती, आणि आपली एकजूट पुन्हा एकदा जगासमोर सिद्ध करण्याची वेळ आहे.

५ जुलै, मुंबईत मराठी माणसाचा एकतेचा आवाज आसमंत दुमदुमवेल! असे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

### पारनेरमध्ये अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीची कारवाई



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२८, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील पळसपूर परिसरात मुळा नदीपात्रातून चोरटी वाळू वाहतूक करणार्या ढंपरवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत २० लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एक जणाला ताब्यात घेण्यात आले आहे. वाहन मालक मात्र पसार झाला आहे. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार गणेश लोंढे, गणेश धोत्रे, रणजीत जाधव, रमीजराजा आत्तार व भगवान थोरात यांचे पथक गुरूवारी (२६ जून) पारनेर पोलीस ठाणे हद्दीत अवैध वाळू उपशाची माहिती काढत असताना, पथकाला माहिती मिळाली की देसवडे येथून पळसपूरच्या दिशेने एक इसम मुळा नदीतून वाळू उपसा करून ती चोरून वाहून नेत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पथकाने पळसपूर गावच्या शिवारातील महावितरण कंपनीच्या सबस्टेशनजवळ सापळा रचला. काही वेळातच एक संशयास्पद ढंपर वाहन त्या मार्गावरून येताना दिसल्याने त्याला थांबवण्यात आले. वाहन चालकास पोलिसांनी विचारणा केली असता त्याने आपले नाव राहुल कुंडलीक भाईक (वय ३३, रा. कातळवेढा, ता. पारनेर) असे सांगितले. वाहनाची तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात वाळू भरलेली आढळली. राहुलकडे वाहन मालकाबाबत चौकशी केली असता, हे वाहन उल्हास भाऊसाहेब दरेकर (रा. देसवडे, ता. पारनेर) याचे असल्याचे त्याने सांगितले. मात्र उल्हास हा सध्या पसार आहे. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### भुलेश्वर घाटाच्या पायथ्याला अर्धवट जळलेला अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळला



**अक्षराज : शरद भगत**
**दि.२८, यवत :** यवत पोलीस स्टेशन च्या हद्दीतील श्री तिर्थक्षेत्र भुलेश्वर घाटाच्या पायथ्याला अर्धवट जळलेल्या तरुणाचा मृतदेह आढळला असल्याची माहीती पोलीस हवालदार संतोष कदम यांनी दिली आहे.सदर तरुण ३०ते ३५ वयोगटातील असून अंगाने सडपातळ असून त्याच्या डोक्यात, छातीवर, पाठीत धारदार शस्त्राने वार केले आहेत आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सदर तरुणाच्या अंगावरचे कपडे जळून गेले असून फक्त थोडासा लाल चौकडी रंगाचा शर्ट दिसत आहे. बाजूला तपकिरी रंगाचा सँडल त्याला समोरून नक्षीकाम केले आहे, अशा वर्णनाच्या व्यक्तिस कोणी ओळखत असेल तर यवत पोलीस स्टेशन येथे संपर्क करण्याची आवहन पोलिस निरिक्षक नारायण देशमुख यांनी केले आहे.

यवत येथील सहाय्यक पोलीस निरिक्षक महेश माने यांचा संपर्क नंबर ७४९८७१५१६५ तसेच पोलीस स्टेशन संपर्क नंबर ०२११७८/२७५१३३ या नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. माहिती देणार्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल असे ही पोलीस निरिक्षक देशमुख यांनी सागितले आहे. पोलीस हवालदार विनायक हाके यांच्या सरकारी फिर्यादी वरुन अज्ञात व्यक्ति विरोधात यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरिक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलीस निरिक्षक महेश माने पुढील तपास करीत आहेत.




## बस हवी आपली

'बेस्ट'सारख्या उपक्रमांनी बसगाड्या विकत न घेता भाड्यावर घेतलेल्या आहेत. तिथेच सारी गोम आहे.

मुंबईत डबलडेकर बसमधून सर्वांत पुढच्या सीटवरून समुद्रदर्शन घेत प्रवास करण्यातली मौज ही अनेकांसाठी स्मरणीय असेल. आता या डबलडेकर वातानुकूलित झाल्या आहेत. बेस्ट बसची अशी अनेक वैशिष्ट्ये वर्षानुवर्षे होती.

बसमार्गाचा फलक हा कापडी रोलमध्ये काचबंद असे. आगार जवळ आले की बसच्या सर्व खिडक्यांची तावदाने बंद करण्याचे बंधन वाहकावर असे. सध्या मात्र अनेक मार्गांवर बेस्ट बसची प्रतीक्षा ही मोठी समस्या आहे. याच पार्श्वभूमीवर आता मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसईविरार, बदलापूर, अंबरनाथ अशा मुंबई महानगर क्षेत्रातील सार्वजनिक वाहतुकीची एकत्र मोट बांधण्याची योजना आकारास येते आहे.

गेल्या दोन-चार वर्षांपासून सर्व महानगरांमध्ये विजेवर धावणाऱ्या बसगाड्या सार्वजनिक सेवांमध्ये समाविष्ट होत आहेत. त्यात जास्त गचके बसत नाहीत. त्या स्वयंचलित गिअरच्या असल्याने चालकाला शिणवटा कमी येतो. त्यावरचा देखभालीचा खर्च व गरज कमी असल्याने त्या अधिकाधिक काळ रस्त्यावर चालू शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या चालविण्याचा खर्च किलोमीटरमागे डिझेलच्या बसच्या तुलनेत अर्धा किंवा एकतृतीयांश इतका असतो. परंतु या बसच्या किमतीही तुलनेत दुप्पट असतात. डिझेल-सीएनजीची बस ५० ते ७० लाखांपर्यंत येत असेल, तर विजेवरच्या बसगाड्यांची किंमत सव्वा ते दीड कोटींच्या घरांत जाते. यात सर्वाधिक किंमत ही लिथियम बॅटरीची असते. गेल्या दोन-अडीच वर्षात या बॅटऱ्यांबाबत आपण स्वयंपूर्ण होऊ, ही अपेक्षा फोल ठरली. आजही बॅटऱ्यांसाठी बहुतांशकरून चीनवरच अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी कारखान्यांकडून अपेक्षित प्रमाणात बस बाहेर पडत नाहीत. बहुतांश वाहतूक उपक्रमांना याचा फटका बसतो आहे.


बेस्टसारख्या सार्वजनिक वाहतूक उपक्रमांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा बदल म्हणजे त्यांनी या विजेवरच्या बसगाड्या विकत न घेता त्या 'ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट' म्हणजे प्रतिकिलोमीटर दर देऊन चालवायला घेतलेल्या आहेत. त्यात चालक व देखभालीचीही तरतूद आहे. थोडक्यात म्हणजे आपण एखाद्या सहलीला जाताना गाडी भाड्याने घेतो, तेव्हा दिवसाला ३०० किलोमीटर आणि प्रतिकिलोमीटरचा दर आपण मोजतो. त्याच धर्तीवर इलेक्ट्रिक बसउत्पादकांकडून किलोमीटरमागे ४८, ६०, ७० रुपये अशा वेगवेगळ्या दरांनी, विविध उपक्रमांनी बस भाड्यावर घेतल्या आहेत. इथेच सगळी गोम आहे. बस वेळेवर सुटली पाहिजे; अन्यथा दंड वगैरेची तरतूद या कंत्राटात जरूर आहे. तसा दंडही आकारला जातो. परंतु बसउत्पादन रोडावल्याने कंपन्यांना आता हा आतबट्ट्याचा व्यवहार वाटू लागला आहे. त्यामुळे अशा भाडेपट्ट्यावर बस पुरविण्यात त्यांना फारसा रस नाही. त्यापेक्षा थेट खरेदीवाले कुणी ग्राहक असल्यास त्यांना पसंती असते. कंत्राट रद्द झाल्याचा आनंदच होईल, असे सध्या कंत्राटदार खासगीत म्हणतात. साहजिकच अनेक ठिकाणी पुढच्या बसगाड्या आलेल्याच नाहीत. बेस्टच्या डबलडेकरची संख्याही आहे तिथेच थांबली आहे. एकेकाळी बेस्टच्या ताफ्यातील सर्व बसगाड्या स्वतःच्या मालकीच्या होत्या.

आज अडीच हजारापैकी केवळ चारशे-साडेचारशे बसगाड्याच स्वतःच्या मालकीच्या आहेत. बस उत्पादक कंपन्यांना दंड आकारून काम भागणारे नाही. त्यांनी वेळेत बस उपलब्ध करून देणे ही आजची निकड आहे. छोट्या गल्लीबोळांतून वाट काढण्यासाठी कंत्राटदारांमार्फत सुरू झालेल्या मिनी-मिडी किंवा व्हॅनसारख्या बसगाड्याही बाद झाल्या आहेत. दुसरीकडे ॲपआधारित खासगी सिटीफ्लो, मायलो आदी बससेवांना प्रवासी थोडे अधिक पैसे मोजूनही पसंती देत आहेत. पूर्वी बेस्टच्या बसमध्ये छोट्या छोट्या सुविधांवर काटेकोर लक्ष दिले गेले. आता नव्या बसगाड्यांमध्ये चालकाशेजारच्या अरुंद पायऱ्या किंवा तत्सम अडचणींवर मार्ग निघण्याची शक्यता धूसर झाली आहे. केवळ प्रवासी कमी झाले म्हणून बसमार्ग बंद करणे हा उपाय ठरत नाही. सामाईक बससेवा उभारताना या सर्व बाबींवर सखोल विचार करावा लागेल.

# हिंदी भाषेला विरोध... मराठीचे काय ?

शालेय अभ्यासक्रमात पहिलीपासून मराठी शिकवावी कि शिकवू नये यावर राज्यभरात आज रणकंदन माजले आहे. याबाबत सरकारमधील घटक पक्षांमध्येही मतभेद दिसून येत आहेत. काहींच्या मते शालेय अभ्यासक्रमात एक भाषा म्हणून हिंदी भाषा शिकणे काहीच चुकीचे नाही, तर काहींच्या म्हणण्यानुसार राज्यात हिंदीची सक्ती म्हणजे मराठीची गळचेपी करण्याचा प्रयत्न आहे. बिहारमधील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपकडून हा घाट घातला जात असल्याचा आरोपही काही जण करत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ आल्याने यानिमित्ताने आपणच राज्यातील जनतेचे खरे वाली आहोत हे दाखवण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये चढाओढ लागली असून यनिमित्ताने आयते कोळीत हाती आल्याने सध्या या विषयावर मोठ्या प्रमाणात राजकारण केले जात आहे, भव्य मोर्च्यांच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. प्रतिदिन प्रसिद्धी माध्यमांना बातम्या पुरवल्या जात आहेत. 'हिंदी भाषेची सक्ती करायचीच असेल तर सर्वात आधी दाक्षिणात्य राज्यांमध्ये ती करण्यात यावी कारण या राज्यांतील नागरिकांना मातृभाषा आणि इंग्रजी यांव्यतिरिक्त कोणतीच भाषा येत नसल्याने या ठिकाणी परराज्यातून जाणाऱ्यांची मोठी पंचाईत होते'. असा अनाहूत सल्ला देणारेही आज मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. पहिलीपासून हिंदी शिकवावी की शिकवू नये याबाबतचा योग्य तो निर्णय येत्या काही दिवसांत होईलही मात्र ज्या भाषेच्या प्रेमापोटी हिंदीला विरोध केला जात आहे, ज्या भाषेचे आपणच वाली आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष आणि नेतेमंडळींकडून केला जात आहे ती मराठी भाषा आज महाराष्ट्रात सुरक्षित आहे का ? माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला मात्र तिला तिचे पुनर्वैभव केव्हा प्राप्त होणार ? या विषयावर कोणीही काहीच बोलताना आज दिसत नाही. गेल्या काही वर्षांत इंग्रजी भाषेने मराठी भाषेवर जी कुरघोडी केली आहे ती कोणाच्याच लक्षात का येत नाही ? जर मराठीच्या प्रेमापोटी हिंदी भाषेला विरोध होत असेल तर इंग्रजी भाषेला आपण अवास्तव महत्व का देत आहोत ?

आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या



केव्हा लक्षात येणार ? जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, खऱ्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे. इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणाऱ्या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठी तरुणच दिसून येत आहेत. ही गरज आज कोणी निर्माण केली ? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते. साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही. आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणाऱ्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी समजायला तर हवेच. फळविक्रेत्याला मराठीत संवाद साधण्याचा आग्रह धरणाऱ्या एका मराठी तरुणाला मुंब्र्यात मारहाण केली जाते, माफी मागण्यास भाग पाडले जाते, त्याचा व्हिडीओ बनवून समजमाध्यमावर व्हायरल केला जातो, एव्हढे होऊनही सरकार जागे होत नाही. मराठी संघटना याविरोधात आवाज उठवत नाहीत. नेहमीप्रमाणे यामध्ये मनसे हस्तक्षेप करून मुजोर विक्रेत्याविरोधात गुन्हा दाखल करण्यास पोलिसांना भाग पाडते. सोसायटीमधील मराठी रहिवाशांना अन्य अमराठी भाषिकांकडून घरात घुसून शिवीगाळ आणि मारहाण केली जाते तरी मारहाण करणाऱ्याच्या विरोधात तत्परतेने गुन्हा दाखल केला जात नाही महाराष्ट्रात मराठी भाषिकांवर अशीच दडपशाही होत असेल, माराठी भाषेची अशीच अवहेलना केली जात असेल तर मराठी माणसांनी न्याय तरी कोणाकडे मागायचा? आपल्या भाषेविषयी आपले प्रेम लोप पावत चालल्याचे हें परिणाम आहेत. आपल्या मातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार तरी कसे होतील ? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्व कमी होऊन फेब्रुवारीतील 'डेज' उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी ख्रिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाडव्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे. घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. मराठी भाषेला अभिजात दर्जा तर मिळाला मात्र त्यानंतर राज्यात मराठी भाषा वाढवण्याचे आणि समृद्ध करण्याचे, मराठी रक्षणाचे जे प्रयत्न व्हायला हवेत ते मात्र अद्यापही दिसून येत नाहीत. त्यामुळे पहिलीपासून हिंदी भाषेच्या सक्तीला ज्या प्रमाणात आज विरोध केला जात आहे त्या प्रमाणात मराठी भाषेच्या सन्मानासाठी आपण केव्हा प्रयत्न करणार आहोत याचा विचार प्रत्येक मराठी माणसाने करायला हवा.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## खा. प्रतिभा धानोरकर यांच्याकडून अपघातग्रस्त महिलेला तातडीची मदत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** चंद्रपूर येथील रेल्वे क्रासिंगजवळ काही दिवसांपूर्वी झालेल्या एका भीषण अपघातात रामकला रामचंद्र सिडाम रा. मुधोली, ता. भद्रावती ही महिला गंभीर जखमी झाली. या अपघातात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, मेंदूत रक्तस्राव झाल्याने तिची प्रकृती चिंताजनक बनली आहे. ही माहिती मिळताच खा. प्रतिभा धानोरकर यांनी तात्काळ रामकलाला मदतीचा हात पुढे केला. त्यांच्या माध्यमातून सुयोग भोयर यांनी तिचा मुलगा धर्माला आर्थिक मदत दिली आहे.

अपघातग्रस्त रामकला यांचा मुलगा धर्मा यांची कौटुंबिक आणि आर्थिक परिस्थिती अत्यंत




हलाखीची आहे. तो सध्या चंद्रपूर येथे बीएसडब्ल्यु च्या द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आहे आणि शासकीय वसतिगृह क्रमांक २ मध्ये राहून शिक्षण घेत आहे. त्याच्या कुटुंबाकडे कोणतीही स्थावर मालमत्ता नाही. २०१७ मध्ये धर्माचे वडील वारले असून, रामकला स्वत: मजूरी करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होत्या. एकीकडे स्वत:चे शिक्षण आणि दुसरीकडे आपल्या आईच्या उपचाराची आणि कुटुंबाची जबाबदारी, अशा दुहेरी परिस्थितीत धर्मा संघर्ष करत असतानाच हा दुर्दैवी अपघात घडला आहे. सध्या रामकलावर दिक्षित हॉस्पिटल, चंद्रपूर येथे उपचार सुरु आहेत. तिच्या उपचारासाठी मोठ्या आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी तातडीने मदत करुन माणूसकीचा आदर्श घालून दिला आहे.

### काळी आई..

ओसाड शिवारांतून
एक्स्प्रेसहायवे जाई
त्वरा करा रे मुलांनो
विकाया काळीआई

स्वप्नात ना पाहिल्या
लाभणारं सुख सोई
लाभान्वीतयोजनात
वाढो उत्पन्न दरडोई

बाजूला ठेवा भावना
जमीन मालकी जाई
घड्याळांसबांधलेली
रे नोकरी पक्की होई

पूर्वज पागल समस्त
मातीत शोधी कमाई
आळसांत झोपू मस्त
होऊ सुखे घर जमाई

डोई जड बा जितराब
छान भाव देई कसाई
सुस्त बैल चारा खाई
भाकड झालेल्या गाई

नदीने बदलला प्रवाह
नाले जलसमाधी घेई
काळे ढग बावचळले
नांदी प्रगतयुगाची देई

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## सोलापुरात उद्या युवा आणि युवती सेनेच्या वतीने विद्यार्थी करिअर मेळावा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२८, सोलापूर :** युवती सेना आणि युवा सेनेच्या वतीने सोमवारी ३० जून २०२५ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे करियर मार्गदर्शन मेळावा आणि गुणवंत विद्यार्थी सन्मान समारंभ कार्यक्रमाचे युवतीसेना व युवासेना च्या वतीने आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रमुख इंजि प्रियांका परांडे यांनी दिली आहे.

हा कार्यक्रम सोमवारी दुपारी १२ ते सायं ६. वाजेपर्यंत अचीवर्स हॉल,पोलिस हेड क्वार्टर च्या समोर, सिविल चौक, सोलापूर याठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात 'पोरा अजून थोड लढून बघ' या विषयावर प्रा.विक्रमसिंह मगर, यांचे व्याख्यान होईल. तसेच



छत्रपती संभाजीनगर येथील बोर्डेज अकॅडमीचे प्रा. संतोष बोर्डेज यांचेही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. वरील कार्यक्रमासाठी माझी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, युवा सेनेचे सचिव किरण साळवी हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार आहेत.

तर माजी आमदार ऍड. शहाजीबापू पाटील, प्रा.शिवाजीराव सावंत, महेशनाना साठे, संजयबाबा कोकाटे, अनिताताई माळगे, सागरदादा पाटील, महेश चिवटे, अमर पाटील, अमोल शिंदे, चरणराज चवरे मनीष काळजे , सचीन चव्हाण, लक्ष्मीकांत ठोंगे पाटील, सुजित खुर्द, शितलताई म्हेत्रे, प्रियदर्शन साठी, बालाजी बागल, गणेश जाधव, महादेव भोसले, अभय देशमुख आदी शिवसेनेचे सोलापूर जिल्ह्यातील विविध विभागाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी सर्वांनी उपास्थित राहावे असे आवाहन युवा सैनिक समी मौली व प्रियंका परांडे यांनी केले आहे.

## माजी मंत्री ॲड. सुलेखाताई कुंभारे यांचा सत्कार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** महाराष्ट्र शासनाचा नामांकित फुले शाहू आंबेडकर पुरस्कार कामठी येथील ओगावा सोसायटीला नुकतात मुंबई येथील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट याच्या प्रमुख उपस्थितीत ओगावा सोसायटीच्या संस्थापक अध्यक्षा माजी राज्यमंत्री अँड. सुलेखाताई कुंभारे यांना बहाल करण्यात आला.

फुले शाहू आंबेडकर चळवळीत सामाजिक व शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अँड. सुलेखाताई कुंभारे यांच्या ओगावा



सोसायटीला मिळालेला पुरस्कार नागपुरच्या इतिहासात हा मानाचा तुरा असल्याचे खापरखेडा येथील समाजसेवी दिलीप बंसोड, दिवाकर घेर, अनिल भोयर, गणेश लोणारे यांनी कामठी येथील ड्रॅगन पॅलेस टेंपल येथे माजी राज्यमंत्री सुलेखाताई कुंभारे यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वर शिवसेनेच्यावतीने वेण्णा माईंची भरली ओटी



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२८, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथे सध्या पावसाच्या जोरदार सरी बरसत असून महाबळेश्वर परिसरातील ओढे धबधबे ओसंडून वाहत आहेत यातच महाबळेश्वर पाचगणीची तहान भागवणारे वेण्णा तलाव आणि ग्लेन ओगल धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. वेण्णा लेक येथील सांडव्यावरून पाणी जून महिन्यातच ओसंडून वाहू लागले आहे. याच वेण्णा लेक व ग्लेन ओगल धरणावरती दरवर्षी शिवसेना महाबळेश्वर यांच्या मार्फत खणा नारळाचे ओठी भरून परडी सोडली जाते. या वर्षी देखील शिवसेनेच्या वतीने वेण्णा माईंची ओटी भरून परडी सोडण्यात आली.

यावेळी शिवसेना शहरप्रमुख विजय नायडू, महाबळेश्वर अर्बन ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक सतीश ओंबळे, शहर संघटक सुनील ढेबे, अल्पसंख्यांक शहर प्रमुख उस्मान खारखंडे, शिवसेना वैद्यकीय कक्ष तालुका राजाभाऊ पंडित, शिवसेना तालुका समन्वय गोविंद कदम, उपशहर प्रमुख सचिन गुजर शाखा प्रमुख असलम डांगे किरण मोरे शाखाप्रमुख हर्ष साळुंखे विघ्नेश ढेबे महिला तालुका मेघा चोरगे, महिला शहर संघटिका सुनीता फळणे, उपशहर संघटिका आशा जाधव, महिला शाखा मंगल फळणे, महिला शाखा शितल ओतारी, प्रभा नायडू व महिला पदाधिकारी व शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लहान मुलांमध्ये दिसून आला भक्ती भाव !



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२८, खंडाळा (सातारा) :** २८ जून २०२४ वार शनिवार रोजी अंगणवाडी मिलींदनगर येथे अंगणवाडी ते भैरवनाथ मंदिर येथील लहान मुलांची दिंडी सोहळा पर्यंत निघाली लहानशी मुले टाळ वाजवत रस्त्यानी निघाली. तेव्हा रस्त्याने उभी असलेली माणसे लहान वारकर्यांकडे पाहतच राहीली. तसेच आरती गोसावी यांनी दिंडीचे स्वागत केले.

भैरवनाथ मंदिरात मुलांना खाऊ वाटप केला दिंडीमध्ये पालकवर्ग सहभागी झाला होता. पालक तसे लहान मुले यांनी फुगड्या खेळल्या. तसेच पालकवर्गांनी आणलेले खाऊ वाटप केला. रोहिणी दादासो जाधव यांनी मुलांना फरसाना केळी वाटप केली. दिंडी सोहळ्यासाठी भारतीय जनता पार्टीचे खंडाळा तालुका सदस्य तेजस प्रभाकर जाधव हे उपस्थित होते. त्यांनी या लहान मुलांचे विशेष कौतूक केले. पूनम कुंभार, रोहिणी जाधव, राजेश्री तिडके, करिश्मा शेख, कल्पना कडाळे, सुप्रिया जाधव, जाधव अर्चना, शिरावळे बेबी, शिरावळे गावातील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. अंगणवाडी सेविका वैशाली गुरव यांनी दिंडीचे आयोजन केले होते.

## अनधिकृत शाळांविरोधात अधिकृत शाळांचा बंद !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, दिवा (ठाणे) :** दिव्यातील अनधिकृत शाळा बंद होत नसल्याने दिव्यातील अधिकृत शाळा १ जुलैपासून बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा इंडिपेन्डन्ट स्कुल मॅनेजमेंट असोसिएशन या संघटनेच्या वतीने देण्यात आला.

शिक्षण विभागामार्फत दरवर्षी शहरातील अनधिकृत शाळांची यादी प्रसिद्ध केली जाते. या शाळांमध्ये पाल्यांनी आपल्या मुलांना पाठवू नये, असे सांगितले जाते. आताच्या घडीला मोठ्या प्रमाणात अनधिकृत शाळा असून, यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या मोठी आहे. सध्या इंग्रजी शाळांना चांगली मागणी असल्याने नावाजलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रत्येक पालकांना आपल्या मुलाला टाकणे शक्य होत नाही.

**४० ते ४५ वेळा तक्रारी...**

दिव्यात आजच्या घडीला ८१ शाळा या बेकायदा असल्याचा दावा या संघटनेच्या वतीने करण्यात आला. अनधिकृत शाळांच्या संदर्भात ४० ते ४५ वेळा तक्रारी करण्यात येऊनही पालिकेच्या शिक्षण विभागाला याचे गांभीर्य नसल्याने शिक्षण विभागाकडून कोणत्याच प्रकारची कारवाई या शाळांवर झालेली नाही. यापूर्वी काही शाळांवर कारवाई करण्यात आली होती.

८१ शाळा या बेकायदा असल्याचा दावा संघटनेने केला.मात्र पुन्हा या शाळा सुरू झाल्या असून, ही संख्या कमी होण्याऐवजी आता वाढली असून, ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळेच या बेकायदा शाळांना अभय मिळत असल्याचा आरोप संघटनेनी केला. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिव्यातील अधिकृत शाळा १ जुलैपासून बेमुदत बंद राहणार आहेत.

## पाटण येथे शिकार प्रकरणी तीनजण ताब्यात



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२८, पाटण :** येथे रानडुक्कर वन्यप्राण्याची शिकार केल्या प्रकरणी तीनजणांना वनविभागाने ताब्यात घेतले आहे वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार शनिवार दिनांक २७ ०६ २०२५ रोजी दुपारी ३.३० च्या दरम्यान वनविभागाला मिळालेल्या गुप्त माहिती नुसार रानडुक्कर वन्यप्राण्याची शिकार करून पाटण येथे आणले असल्याचे कळताच सदर गुन्ह्यातील आरोपी १) नारायण शिवाजी पवार वय ४५ वर्ष २) उत्तम रामू पवार वय ६०दोघे रा.म्हावशी ता.पाटण जि सातारा ३) पंढरीनाथ यशवंत पाटील ५४

रा.येरफळे ता.पाटण यांना ताब्यात घेऊन त्यांचे विरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही उपवनसंरक्षक सातारा श्रीमती आदिती भारद्वाज, सहाय्यक वनसंरक्षक श्री महेश झांजुर्णे यांचे मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी पाटण राजेश नलवडे , वनपाल पाटण निलेश कुंभार, वनरक्षक पाटण निखिल कदम, वनरक्षक मोरगिरी रोहित लोहार, वनरक्षक पाचगणी विलास वाघमारे, वनरक्षक बहुले मेघराज नवले, वनरक्षक गोवारे राम मोटे कायम वनमजूर संजय जाधव यांनी केली.

## बीएसपी तर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्सव साजरा



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, ठाणे :** बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेश कमिटी तर्फे दि.२६ जून २०२५ रोजी, आयर्विन मल्टीपर्पज हॉल, कोल्हापूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जयंतीउत्सव मोठ्या उत्साहात आणि धुमधडाक्यात साजरा करण्यात आला.

बीएसपी चे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष, तथा माजी खासदार राजाराम गौतम यांच्या प्रमुख उपस्थितीत, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र महासचिव हुलगेशभाई चलवादी, तसेच महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यांमधून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

कार्यक्रमाचे नियोजन अगदी सुंदर पद्धतीने, कोकण झोन प्रभारी किरण अल्हाट यांनी केले होते, त्याची अंमलबजावणी, कोल्हापूर जिल्हा प्रभारी संदीप शिंदे, जिल्हाध्यक्ष रवींद्र कांबळे आणि त्यांच्या टीमने उत्कृष्ट पद्धतीने केली. सदर कार्यक्रमात प्रबोधनपर गीतांचा जलसा सादर करण्यात आला. त्यामुळे प्रेक्षकांच्या उत्साहात आणखी भर पडली. ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष भालेराव यांच्यासह २०० कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवला. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणाहून बसपा पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक व कोल्हापूरवासी नागरिक यांनी आपली उपस्थिती दर्शवित कार्यक्रमाची शोभा वाढविली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जयंती उत्सव सणाप्रमाणे साजरा करावा. त्याप्रमाणे बहुजन समाज पार्टी तर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात, अगदी सणाप्रमाणे साजरा करण्यात आला.

## पवनचक्की कंपनीच्या वीजेच्या धक्क्याने म्हशीचा मृत्यू !



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२८, पाटण (सातारा) :** पाटण तालुक्यातील केर विभागतील भिकाडी येथे सुझलॉन पवनचक्कींचे कंपनीच्या अर्थींगवायरचा धक्का लागून गाभन म्हैशीचा अपघाती मृत्यू झालेला आहे. घरातील पशुधनाचा मृत्यू झाल्यामुळे संबंधित शेतकर्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

याबाबत संतोष लक्ष्मण झोरे रा. भिकाडी ता. पाटण या शेतकर्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असून एक महिन्यापूर्वी त्याच्या वडिलांचे दुःखद निधन झाले आहे. त्याची गाभन म्हैस त्याची आई पठारावर गवत चरण्यासाठी घेऊन गेली असता दि.१७ जून रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सुझलॉन पवनचक्कीं कंपनीचे टॉवर जवळ अर्थींगवायर चा स्पर्श झाल्याने म्हैशीचा जागीच मृत्यू झाला.

पावसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याने वैद्यकीय अधिकारी यांच्या शी दोन दिवसांनंतर संपर्क साधला. त्यांनी घटनास्थळी तातडीने भेट दिली. सदर म्हैशीचे शवविच्छेदन व पंचनामा संबंधित अधिकार्यांनी केला.

संबंधित सुझलॉन पवनचक्कींचे अधिकारी कर्मचारी वर्गाला सदर घटना समजली परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. आज तब्बल आठ ते नऊ दिवस होत आले तरी घटनास्थळी म्हैस आहे. आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. कंपनीच्या चूकीच्या कारभाराला कोणाची वचक नाही. एका गरीब शेतकर्यांचे पशुधन गेल्याने शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत आहे.

**गरीब कुटुंबाला मदत मिळणे गरजेचे...**

एक महिन्यापूर्वी वडिलांचे निधन आणि आता लगेचच हातातोंडाशी आलेले जनावर गेल्याने कुटुंबातील उत्पनाचा मार्ग नाहिसा झाला आहे. अत्यंत हालाखीची परिस्थिती असल्याने सदर कंपनी ने त्यांना नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे अशी लोकांची मागणी आहे.

### बियाणे उगवले नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ कृषी अधिकाऱ्याकडे तक्रारी कराव्यात - अशोक रोडे

## शेतकरी कामगार पक्ष बी-बियणे कंपनी विरोधात कोर्टात जाणार



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२८, केज (बीड) :** खरिपाची पेरणी पाऊस बरा झाल्याने शेतकरी लगबगिने केली मात्र महाबीज सह अनेक कंपन्याचे सोयाबीन शेतामध्ये उगवले नाही, अशा शेतकऱ्यांनी तात्काळ संबंधित कृषी कार्यालयशी संपर्क साधून आपल्या तक्रारी कराव्यात अशा आव्हान शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई अशोक रोडे यांनी केले आहे.

केज तालुक्यातील शे.गांजी येथील पंधरा-वीस शेतकरी काल शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात आले,त्यांनी बी उगवलं नसल्याची तक्रार कृषी कार्यालयाकडे दिली असल्याचे सांगितले,मात्र कृषी कार्यालयाचे अधिकारी आठ दिवस झाले त्यांच्याकडे कोणीही पंचनाम्याला गेले नाही अशी माहिती सदरील शेतकऱ्यांनी दिली यानंतर शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनी वरिष्ठ कृषी अधिकारीशी बोलून तात्काळ पंचनामे करून घ्या असं विनंती केली आहे.

बीड धाराशिव (उस्मानाबाद), लातुर विभागाला बियाणेच परीक्षण करणारा अधिकारी एकच आहे त्यामुळे विलंब होणार,पंचनाम्यासाठी परभणी विद्यापीठातून अधिकारी येणार नंतर त्याचे सॅम्पल घेऊन ते अहवाल देणार असल्यामुळे केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आधी संबंधित कृषी कार्यालयाकडे द्याव्यात. दुकानदाराकडून घेतलेले बियाण्याची पावती जपून ठेवावी जेणे करून कंपनी आणि दुकानदाराकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी सोपं जाईल शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा आहे.

मात्र शेतकऱ्यांनी तक्रारी देणे गरजेचे आहे.असे आव्हान शेकापचे भाई अशोक रोडे,भाई रचलिंग पाटील,भाई मंगेश देशमुख,अजिंक्य माने यांनी केले.

## सरन्यायाधीश पदापर्यंतच्या प्रवासात नागपूरचे योगदान महत्वपूर्ण - सरन्यायाधीश गवई




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** शहरासोबत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. दरवर्षी धम्मप्रवर्तन दिनी आई- वडीलांसोबत दिक्षाभूमीवर येत असे. पुढे वकिली व न्यायदान क्षेत्रात नागपूर जिल्हा व सत्र न्यायालय, जिल्हा वकील संघटना आणि उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ येथे काम करतांना बऱ्याच गोष्टी आत्मसात करता आल्या, अशा भावना भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आज येथे व्यक्त केल्या.

जिल्हा व सत्र न्यायालय येथे नागपूर जिल्हा वकील संघटनेच्या वतीने सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई आणि पत्नी डॉ. तेजस्विनी गवई, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, ज्येष्ठ न्यायमूर्ती अनिल किलोर, न्यायमूर्ती अभय मंत्री आणि नागपूरचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश दिनेश सुराणा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, नागपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने देशाला महान वकील व न्यायाधीश दिले. जिल्हा वकील संघटनेच्या माध्यमातून रचनात्मक कार्य उभे राहिले आणि उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाद्वारे जनहित याचीकांचा प्रभावी उपयोग होवून जनहिताचे कार्य झाले. या तीनही संस्थांमध्ये कार्य करण्याची संधी मिळाली. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी विराजमान होताच विदर्भातील झुडपी जंगलाचा प्रश्न सोडवून यामाध्यमातून गोरगरीब आणि शेतकऱ्यांना न्याय देता आला. याचे समाधान असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात घटना समितीच्या सदस्यांनी भारत देशाला अभूतपूर्व अशी राज्यघटना दिली. समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधूता या मुल्यांद्वारे राज्यघटना देशाला मार्गदर्शन करीत असून सामान्य व्यक्तीच्या अधिकाराचे रक्षण न्यायपालिका करीत असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायपालिकेच्या सर्वोच्च पदाची जबाबदारी सांभाळतांना प्रत्येकाला न्याय देण्याची भूमिका कायम ठेवणार असल्याच्या भावनाही त्यांनी व्यक्त केल्या. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाच्या आदेशानुसार सन २००१ मध्ये झोपडपट्ट्या काढण्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात स्थगिती देण्यात बजावलेल्या भूमिकेची आठवण सांगत हजारो झोपडपट्टी वासीयांचा निवारा वाचवू शकल्याच्या भावना त्यांनी मांडल्या. नागपूर येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ उभारण्यासाठी प्रयत्न केले व त्यास यश आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. विधी क्षेत्रातील एकूण ४० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहकार्य लाभलेल्या सर्वांबद्दल कृतज्ञताही त्यांनी व्यक्त केली. विधी क्षेत्रातील वाटचाल व त्यातील विविध वळणांबाबत त्यांनी यावेळी मनमोकळे विचार मांडले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायुमूर्ती न्या.अतुल चांदूरकर, न्या.प्रसन्न वराळे, न्या. दीपांकर दत्तो आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या. आलोक आराधे आणि जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रमुख न्यायमूर्ती दिनेश सुराणा यांनी आपल्या संबोधनात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्व व कार्यावर प्रकाश टाकला. नागपूर जिल्हा वकील संघटना आणि विदर्भातील विविध विधी संघटनांच्या वतीने यावेळी न्या. गवई यांचा सत्कार करण्यात आला. नागपूर जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे यांनी प्रास्ताविक केले तर सचिव मनिष रणदिवे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते जिल्हा व सत्र न्यायालयाच्या विस्तारित इमारतीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे अनावरण आणि इमारतीच्या परिसरात तीन भाषांमधील संविधान उद्देशिकेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांच्या हस्ते डिजिटल ग्रंथालयाचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले.

# अहिल्यानगरमध्ये 3 बांगलादेशी घुसखोरांना अटक



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील एमआयडीसी पोलीस स्टेशन आणि सैन्य कमांड मिलिट्री इंटेलिजन्स यांच्या संयुक्त कारवाईत ३ बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे. पोखर्डी गावातील वारुळे वस्ती येथील खडी क्रशरजवळील सिमेंट बांधकामाच्या खोलीतून एमआयडीसी पोलिसांनी आणि सैन्य कमांड मिलिट्री इंटेलिजन्सच्या सहकार्याने ही कारवाई केली. यात बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड आणि इतर कागदपत्रे जप्त करण्यात आली.

एमआयडीसी पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, पोखर्डी गावात काही बांगलादेशी नागरिक अवैधपणे राहत आहेत. यानंतर सपोनि माणिक बी. चौधरी यांच्या नेतृत्वाखाली एमआयडीसी पोलीस आणि सैन्य कमांड मिलिट्री इंटेलिजन्स यांनी संयुक्त छापा टाकला. यात संशयित जहांगिर अवुताहेर शेख (वय ३४, रा.चट्टोग्राम, बांगलादेश), हनीफ अब्दुल खलीद शेख (वय ४०, रा. शेनबाग, बांगलादेश) आणि मुश्फ हवीव शेख (वय ४०, रा. चट्टोग्राम, बांगलादेश) यांना ताब्यात घेतले.तपासात या तिघांकडे भारतात राहण्यासाठी कोणताही व्हिसा किंवा परवानगी नसल्याचे एमआयडीसी पोलिस आणि सैन्य कमांड मिलिट्री इंटेलिजन्सने उघड केले. त्यांच्याकडील कागदपत्रे बनावट असल्याचे आढळले. एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. एमआयडीसी पोलीस आणि सैन्य कमांड मिलिट्री इंटेलिजन्स यांच्या पथकात मनोज मोंढे, राकेश खेडकर, राजू सुद्रीक, किशोर जाधव, सुरज देशमुख, जयसिंग शिंदे, शेरकर, दहिफळे आणि मोबाइल सेलचे राहुल गुंडू यांचा समावेश होता.

# आ. मुनगंटीवारांमुळे पहिल्याच टप्प्यात शेतकऱ्यांच्या खात्यात ९४ कोटी रुपयांचा बोनस जमा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव अग्रेसर असलेले राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात बोनस जमा होण्यास सुरूवात झाली आहे. यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी चर्चा केली होती. धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस मिळाला तर शेतकऱ्यांचे मनोबल वाढेल, याकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला आणि आता शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष बोनस देखील जमा होण्याची सुरूवात झाली आहे.

खरीप हंगाम २०२४-२५ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत सहभागी झालेल्या नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. पहिल्या टप्प्यात चंद्रपूर जिल्ह्यातील पणन अधिकारी विभागाकडे ६९ कोटी रूपये तर आदिवासी विकास महामंडळाकडे २५ कोटी रूपये धान बोनस जमा झालेला असुन पाहिल्या टप्प्यातील एकूण ९४ कोटी रूपये शेतकऱ्यांच्या थेट पैसे खात्यात धानाच बोनस जमा होण्याची सुरुवात झालेली आहे. उर्वरित सर्व शेतकऱ्यांना लवकरच बोनस मिळणार आहे.

यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत. राज्य शासनाने धान लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्रानुसार, प्रती हेक्टर २० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर बोनस देण्याचा शेतकऱ्यांना द्यावा, अशी मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत रेटून धरली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य सरकारने यासंदर्भात निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.



**कायम शेतकऱ्यांप्रती संवेदनशील**

आ.मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची विक्रमी २०२ कोटीची रक्कम मिळू शकली होती. यापूर्वी ही धानाच्या बोनससाठी पाठपुरावा करत बोनस मिळवून दिला होता. शेतकऱ्यांप्रती आ. मुनगंटीवार सदैव संवेदनशील असतात.

विशेष म्हणजे, नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी धान विक्री केली असो वा नसो, तरीही शेतकऱ्यांना ही प्रोत्साहनपर रक्कम दोन हेक्टरच्या मर्यादेत दिली जावी, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली होती. ती देखील राज्य शासनाने मान्य करून तसा निर्णय जाहीर केला होता.

या निर्णयामागे आ. सुधीर मुनगंटीवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विधानसभेतील मागणी महत्त्वाची ठरली. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत अन्न व नागरी पुरवठा विभागाने २५ मार्च रोजी शासन निर्णय निर्गमित केला होता आणि आता शेतकऱ्यांच्या खात्यात हा बोनस जमा होण्याची सुरुवात झाली आहे. राज्यभरातील धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये या निर्णयामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबद्दल आ.सुधीर मुनगंटीवार यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

# रेशनकार्ड धारकांना ३ महिन्यांचे आगाऊ रेशन

## धान्य वितरण गतीने करण्याचे पुरवठा अधिकाऱ्यांचे आदेश; वाटपात गडबड केल्यास कारवाईचे शासन निर्देश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, अहिल्यानगर :** आगामी पावसाळा आणि परिणामी पूर आणि प्रतिकुल वातावरणामुळे जिल्ह्यातील शिधापत्रिका धारकांना ऑगस्ट २०२५ पर्यंतची (३ महिन्याचा) मोफत धान्याची उचल एकदम देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी बढे यांनी दिली.

दरम्यान,शासन स्तरावरून वारंवार फॉलोअप होत असल्यामुळे धान्य वितरण लवकर करा. परमिट्स गतीने द्या,या कामात हलगर्जीपणा झाल्यास शासनाने कारवाई करण्याचे निर्देश दिले असून, कोणाचेही नुकसान होऊ नये यादृष्टीने आपले काम वेळेवर व गतीने पूर्ण करा, असेही आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी बढे यांनी रेशन दुकानदारांना दिले आहेत. गरिबांवर उपाशी राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी शासनाकडून लाभार्थ्यांना पूर्णपणे मोफत धान्य पुरविले जाते. कोट्यावधी रुपये शासन या योजनेवर खर्च करीत आहे. पूर्वी शासनाकडून ३ रुपये प्रतिकिलो दराने तांदूळ आणि दोन रुपये प्रति किलो दराने गहू दिला जात होता. करोना प्रादुर्भावामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या गरिबांची उपासमार होऊ नये. यासाठी केंद्र सरकारने मोफत धान्याची योजना जाहीर केली होती. ती तशीच आजही चालू आहे. या योजनेद्वारे प्रतिमाही मोफत धान्य देण्यात येत होते. मात्र आगामी पावसाळा आणि परिणामी पूर प्रतिकुल वातावरणामुळे धान्य साठवणुकीची अडचण लक्षात घेता सलग ३ महिन्याचा माल कोठा एकदाच देण्याचे आदेश शासन स्तरावरून आले आहेत.

# संत गजानन महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात स्वागत



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२८, सोलापूर :** श्री संत गजानन महाराज शेगाव यांच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यामध्ये शनिवार, दिनांक २८ जून २०२५ रोजी आगमन झाले असून सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कुलदीप जंगम यांनी स्वागत केले. यावेळी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याण शेट्टी उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यातील कासेगाव हद्दीत संत गजानन महाराजांच्या पालखीचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्वागत केले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर संतोष नवले, गटविकास अधिकारी शंकर कवितके, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर नीलम घोगरे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर संतोष कुमार, कासेगाव सरपंच यशपाल वारकर, उळे गाव सरपंच अंबिका कोळे उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर व मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी वारकऱ्यांना आरोग्य किट देऊन पालखीचे स्वागत केले.

# महानगर गॅस अधिकाऱ्यांची खा.म्हस्के यांनी केली कान उघडणी

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२८, ठाणे :** ठाणे शहरातील नौपाडा, राम मारुती रोड, घंटाळी, भास्कर कॉलनी आणि आजूबाजूच्या परिसरातील अनेक गृहसंकुलांमध्ये अजूनही पाईप लाईनद्वारे घरगुती गॅस जोडणी झालेली नाही. जुने ठाणे अद्याप घरगुती गॅस जोडणी पासून वंचित आहे. आज ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी रहिवासी आणि महानगर गॅस यांची संयुक्त बैठक घेत अधिकाऱ्यांची कान उघडणी केली. तसेच या रहिवाशांना तातडीने पाईप लाईनद्वारे घरगुती गॅस जोडणी करावी.

जुन्या ठाण्यात घरगुती गॅस जोडणीची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. महानगर गॅस लिमिटेड (चत्रख्ङ) या कंपनीकडे या संदर्भात मागणी करण्यात आली, अर्ज दिले, बैठकाही घेण्यात आल्या, परंतु अद्याप ठोस कार्यवाही झालेली नाही. या भागातील नागरिकांना घरगुती गॅस ऐवजी सिलेंडरवर अवलंबून राहावे लागत आहे. या समस्येला वाचा फोडण्यासाठी आणि नागरिकांच्या मागण्या अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी शिवसेनेचे पदाधिकारी किरण नाकती, प्रकाश पायरे, बाळा गवस, संजीव कुलकर्णी यांनी पुढाकार घेतला. महानगर गॅस लिमिटेडच्या अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करण्यासाठी त्यांनी एक विशेष बैठक आयोजित केली. ही बैठक आनंद आश्रम येथे खासदार नरेश म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीत महानगर गॅसचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते आणि विविध गृहसंकुलांचे पदाधिकारी उपस्थित होते. नागरिकांनी आपल्या तक्रारी अत्यंत स्पष्टपणे मांडल्या. काही ठिकाणी गॅस लाईनच पोहोचलेली नाही, तर काही ठिकाणी कनेक्शनसाठी मोठ्या प्रमाणात अडथळे येत आहेत, काही सोसायट्यांमध्ये सर्व प्रक्रिया पूर्ण करून देखील जोडणी झालेली नाही, अशा रहिवाशांनी तक्रारी केल्या. या बैठकीत शिवसेनेचे किरण नाकती आणि प्रकाश पायरे यांनी अनेक सोसायटी संदर्भात समस्या मांडल्या आणि महानगर गॅस प्रशासनासमोरील अडचणी समजावून सांगितल्या.

# थोडक्यात

## आर्ट ऑफ लिविंग स्वयंसेवकांकडून लोणंद पालखी तळाची स्वच्छता



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२८, खंडाळा (सातारा) :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास काल दुपारी लोणंदकरांनी निरोप दिल्यानंतर अवघ्या काही तासात संपूर्ण पालखी तळाची लोणंद नगर पंचायत स्वच्छता कर्मचारी आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे खंडाळा तालुका प्रशिक्षक शिवदास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली युवाचार्य ॲड.गजेंद्र मुसळे, युवराज गाढवे, रणजित कदम, धुळा कराडे, अभि भोसले, मोहित पवार, विशाल क्षीरसागर, सोमनाथ पिंगळे, ॲड.गणेश धायगुडे, मिलिंद धायगुडे, रेखा गाढवे, प्रशांत तावरे, धनंजय नेवसे आदीसह १०० युवाचार्यांनी सहभाग घेऊन जवळपास तीन टन कचरा गोळा करत स्वछता केली.

गेली दीड दिवस रात्रंदिवस माऊलींच्या दर्शनासाठी रांगांचे नियोजन देखील आर्ट ऑफ लिविंगच्या माध्यमातून करण्यात आले होते. माऊलींच्या पालखीतळावर ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तेव्हा लोणंद नगरपंचायत मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड, रोहित निंबाळकर, सदाभाऊ शेळके आणि नगरपंचायत स्वच्छता विभाग यांनी देखील सहभाग घेतला.

या उपक्रमात सहभागी आर्ट ऑफ लिविंग स्वयंसेवक यांच्यासाठी मालोजीराजे विद्यालय लोणंदच्या १९९३ बॅचच्या वतीने अमोल ठोंबरे, विशाल जाधव, डॉ.मनीषा काकडे आदींनी जेवणाची सोय केली होती.

## आज मुंबईत रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२८, मुंबई :** आज मुंबईत मेगाब्लॉक मुळे मुंबईकरांचे मेगाहाल होण्याची शक्यता आहे.आज मध्य रेल्वेसह रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक आयोजित करण्यात येणार आहे. रेल्वे मार्गावरील रुळांची दुरुस्ती आणि सिग्नल यंत्रणेतील तांत्रिक कामांसाठी रविवारी रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. हे. मध्य रेल्वेच्या ठाणे ते कल्याण अप आणि डाऊन जलद मार्गावर, तर पनवेल ते वाशी अप-डाऊन हार्बर मार्गावर (पोर्ट लाइन वगळून) मेगाब्लॉक असणार आहे. यामध्ये पश्चिम रेल्वेच्या नागरिकांना मात्र काहीसा दिलासा मिळाला आहे. पश्चिम रेल्वे मार्गावर दिवसा कोणताही ब्लॉक घेण्यात येणार नाहीये.मध्य रेल्वेवर सकाळी १०.४० ते दुपारी ३.४० पर्यंत मेगाब्लॉक असणार आहे. अप आणि डाउन जलद मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या काळात सीएसएमटीहून सुटणाऱ्या डाऊन जलद अर्थ जलद लोकल सेवा ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील आणि त्यांच्या संबंधित सुटणाऱ्या अप जलद व अर्थ जलद लोकल सेवा कल्याण आणि ठाणे स्थानकांदरम्यान अप धीम्या मार्गावर त्यांच्या संबंधित थांब्यांव्यतिरिक्त वळवण्यात येतील. थांब्यांनुसार कळवा, मुंब्रा आणि दिवा स्थानकांवर थांबतील.तर कल्याणहून मेल/एक्सप्रेस ठाणे-विक्रोळी स्थानकादरम्यान ६व्या मार्गावर वळवल्या जातील.हार्बर मार्गावर सकाळी १.०५ ते दुपारी ४. ०५ वाजेपर्यंत ब्लॉकचा कालावधी असेल. ब्लॉक कालावधीत पनवेलहून सीएसएमटी साठी सुटणाऱ्या अप हार्बर लाइन सेवा सीएसएमटीहून बेलापूर, पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर लाइन सेवा रद्द राहणार आहे. तर, पनवेल येथून सुटणाऱ्या ठाण्याकडे जाणाऱ्या अप ट्रान्स-हार्बर लाइन सेवा आणि ठाणे येथून सुटणाऱ्या पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन ट्रान्स-हार्बर लाइन सेवा रद्द राहतील. या ब्लॉक कालावधीत सीएसएमटी-वाशी विभागात विशेष लोकल चालवल्या जातील.तर ठाणे-वाशी/ नेरूळ स्थानकादरम्यान ट्रान्स-हार्बर सेवा उपलब्ध राहतील.

## इटीसी दिव्यांग मुलांसाठी विशेष आरोग्य शिबीर संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, नवी मुंबई :** नमुंमपा ईटीसी अपंग शिक्षण प्रशिक्षण केंद्रामध्ये वेगवेगळ्या वयोगटातील मतिमंद, कर्णबधीर, स्वमग्न, अंध, अध्ययन अक्षम आणि बहुविकलांग मुले शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधांचा लाभ घेत असतात. ईटीसी केंद्रामार्फत या विशेष मुलांसाठी शिक्षण व विविध थेअरपी सोबत इतरही अनेक उपक्रम राबवले जातात. या नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विशेष मुलांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेतील सर्व शाळा अंगणवाडी यांमध्ये शिक्षण येणाऱ्या सर्व मुलांची आरोग्य तपासणी करण्यात येत असते. याचाच एक भाग म्हणून नमुंमपा ईटीसी केंद्रातील विशेष मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यामध्ये दैनंदिन आरोग्य, हवामानानुसार होणारे आजार या अनुषंगाने मुलांची तपासणी करण्यात आली. या तपासणीकरिता डॉ.अशोक चव्हाण, डॉ.सुस्मिता व्हटकर, डॉ.रणजीत शिर्के, डॉ.भाग्यश्री भोकरे, डॉ.तेजस्विनी जाधव, डॉ.प्रतिभा मुंडे, डॉ.विजय पाटील, डॉ.निखील केसरे या डॉक्टरांसह इतर आरोग्य समुहाने विशेष मुलांची तपासणी केली व गरजेनुसार पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन केले. या आरोग्य शिबीरामध्ये कर्णबधिर विभागातील ११४, मतिमंद विभागातील १०८, बहुविकलांग विभागातील ११ आणि अंध विभागातील १९ तसेच ओपीडी विभागातील २५ अशा एकूण २७७ विशेष मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर आरोग्य तपासणी शिबीर अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या प्रोत्साहना नुसार आयोजित करण्यात आले. ईटीसी केंद्राच्या संचालिका डॉ.अनुराधा बाबर यांनीही या आरोग्य शिबीराच्या सुयोग्य आयोजनामध्ये स्वत: लक्ष दिले. शिबिराच्या आयोजनात केंद्राच्या अधीक्षक आणि मतिमंद विभाग व कर्णबधीर विभाग यांच्या शैक्षणिक व्यवस्थापकांनी विशेष योगदान दिले.